मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २१७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## महात्मा फुले मार्केट पुनर्बांधणीवरुन सभागृहात खडाजंगी; विकासाच्या मुद्द्यावर पुन्हा राजकारणाचे सावट



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील मुख्य बाजारपेठेच्या केंद्रस्थानी असलेल्या महात्मा फुले मार्केटच्या पुनर्बांधणीच्या मुद्द्यावरून महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत आज जोरदार खडाजंगी उडाली. या विषयावरून नगरसेवक अक्षय गोरंट्याल आणि शिवसेनेचे विरोधी पक्षनेते कमलेश खरे यांच्यात तीव्र शाब्दिक वाद रंगला, ज्यामुळे काही काळ सभागृहातील वातावरण तापले.

**दशकभर प्रलंबित प्रकल्प; व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी**

महात्मा फुले मार्केट सुमारे १० ते १५ वर्षांपूर्वी महानगरपालिकेकडून पाडण्यात आले होते. मात्र, इतक्या दीर्घ कालावधीनंतरही या ठिकाणी नवीन मार्केटची उभारणी न झाल्याने व्यापारी आणि नागरकिंामध्ये तीव्र असंतोष आहे.

जुन्या व्यापाऱ्यांचे पुनर्वसन अद्याप प्रलंबित, मुख्य बाजारपेठेचा विकास ठप्प, आर्थिक हालचालींवर परिणाम या पार्श्वभूमीवर नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनी सभागृहात हा मुद्दा आक्रमकपणे उपस्थित करत प्रशासनाला थेट जाब विचारला. गोरंट्याल यांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेवर टीका करत पुनर्बांधणीचा

ठोस आराखडा जाहीर करण्याची मागणी केली.

यावर विरोधी पक्षनेते कमलेश खरे यांनी प्रत्युत्तर देत प्रशासनाच्या प्रक्रियेचा बचाव केला. यानंतर दोघांमध्ये तीव्र शब्दयुद्ध रंगले.

या वादामुळे सभागृहातील वातावरण तणावपूर्ण, घोषणाबाजी आणि आरोप-प्रत्यारोप, काही काळ कामकाज ठप्प राहिले.

स्वीकृत नगरसेवक अर्जुन गेई यांनी या विषयावर माहिती देताना सांगितले की, आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या पुढाकाराने मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत महत्त्वाची बैठक पार पडली होती. त्यानंतर खोतकर यांनीच मार्केटसाठी विरोध केला त्यांनतरच वादाला ठिणगी मिळाली.

सभागृहातील वाढता तणाव लक्षात घेता खुद्द उपमहापौर राजेश राऊत, भास्कर दानवे, पांगारकर, अमोल ठाकुर यांनी हस्तक्षेप करत वाद निवळीला.

हा प्रश्न केवळ मार्केटपुरता मर्यादित नसून शहराच्या व्यापारी अर्थव्यवस्थेशी जोडलेला आहे. १०-१५ वर्षांपासून प्रलंबित असलेली ही योजना अजूनही कागदावरच असल्याने व्यापाऱ्यांमध्ये नाराजी आहे. बैठका, आश्वासने आणि राजकीय हस्तक्षेप असूनही प्रत्यक्ष काम सुरू न होणे ही प्रशासनाची मोठी अपयश मानली जात आहे.

महात्मा फुले मार्केटचा मुद्दा हा आता केवळ स्थानिक प्रश्न राहिलेला नाही, तर शहराच्या आर्थिक आणि व्यापारी विकासाचा केंद्रबिंदू बनला आहे.

प्रशासन आणि लोकप्रतिनिधी एकत्र येऊन या प्रलंबित प्रकल्पाला गती देणार का, की हा मुद्दा पुन्हा राजकारणातच अडकणार?



### पत्रकारांना बसण्याच्या जागेवर इतरांचा ठिय्या



सर्वसाधारण सभेत पत्रकारांसाठी गॅलरीमध्ये विशिष्ट बैठक व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे व राजकारण्याच्या अनास्थेमुळे पत्रकारांच्या जागेवर नगरसेवकांचे नातेवाईक व जनतेने कब्जा केला होता. संबंधित बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी पत्रकारांनी बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. बाहेर आल्यानंतर काही सदस्यांनी पत्रकारांना समजावण्याचा प्रयत्न केला. जागा देण्याचे आश्वासनही दिले असे असले तरी शेवटपर्यंत पत्रकारांच्या जागेवर इतरांचा हक्क दिसून आला. याबाबीकडेही सभागृहासह राजकारण्यांनी व मनपा प्रशासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

महानगरपालिकेच्या उत्पन्नावर परिणाम

## थकीत भाडेवसुलीसाठी विशेष मोहीमेची मागणी

### नगरसेवक महावीर ढक्का सभागृहात आक्रमक

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील कॉम्प्लेक्समधील गाळेधारकांकडून थकीत भाडे तात्काळ वसूल करण्यात यावे, या मागणीसाठी नगरसेवक महावीर ढाक्का यांनी आज सर्वसाधारण सभेत आक्रमक भूमिका घेतली. महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत आणि नवनियुक्त आयुक्त अंजली शर्मा यांच्या उपस्थितीत झालेल्या या सभेत त्यांनी प्रशासनाला थेट सवाल करत शहरातील प्रलंबित प्रश्नांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध कॉम्प्लेक्समधील अनेक गाळेधारकांकडून मोठ्या प्रमाणात भाडे थकीत असल्याचा गंभीर मुद्दा ढाक्का यांनी सभागृहात उपस्थित केला. पालिकेच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत असलेल्या या भाडेवसुलीकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने पालिकेला आर्थिक फटका बसत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

''महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारायची असेल, तर सर्वप्रथम थकीत भाडे वसूल करण्यासाठी विशेष मोहीम राबवली पाहिजे,'' अशी ठाम मागणी त्यांनी केली.

विशेष मोहीम राबवण्याची मागणी ढक्का यांनी प्रशासनाला सुचवले की सर्व थकबाकीदारांची यादी जाहीर करावी, नोटीस देऊन ठराविक मुदतीत भाडे वसूल करावे नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, आवश्यक असल्यास गाळे सील करण्याची कारवाई करावी यामुळे पालिकेचे उत्पन्न वाढून विकासकामांना गती मिळू शकते, असा वश्विास त्यांनी व्यक्त केला.

**वाहतूक कोंडीचा गंभीर प्रश्न; विद्युत पोल हटविण्याची मागणी**

यावेळी त्यांनी शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीचा मुद्दाही जोरदारपणे मांडला.



मुख्य रस्त्यांच्या मधोमध उभे असलेले विद्युत पोल तात्काळ हटविण्यात यावेत, अशी मागणी करत त्यांनी नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला. अरुंद रस्ते + वाढती वाहतूक = अपघातांचा धोका मध्यभागी अडथळे = वाहतुकीत अडचण अशा परिस्थितीत तातडीने उपाययोजना करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

ढक्का यांनी स्पष्ट केले की, केवळ चर्चा करून ट्रॅफिक समस्या सुटणार नाही. महानगरपालिकेने पुढाकार घेत वाहतूक विभागासोबत समन्वय साधून ठोस कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

विशेषत मुख्य चौक, बाजारपेठ परिसर, शाळा-महाविद्यालये, व्यापारी भाग येथे वाहतूक कोंडी गंभीर बनत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

**राजीनाम्याचा इशारा; सभागृहात तणाव**

सभागृहातील चर्चेदरम्यान ढक्का यांचा आवाज अधिक तीव्र झाला. प्रशासनावर नाराजी व्यक्त करत त्यांनी थेट इशारा दिला ''जर शहरातील मूलभूत प्रश्नांवर तात्काळ कार्यवाही झाली नाही, तर मला राजीनामा देण्याचा विचार करावा लागेल.'' या वक्तव्यानंतर काही काळ सभागृहात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

**प्रलंबित प्रश्न पुन्हा चर्चेत** महावीर ढाक्का यांच्या आक्रमक भूमिकेमुळे भाडेवसुलीचा प्रश्न, वाहतूक कोंडी, पायाभूत सुविधा हे सर्व मुद्दे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. जालना महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत उपस्थित केलेल्या मुद्द्यांमुळे शहरातील आर्थिक आणि पायाभूत अडचणी अधोरेखित झाल्या आहेत. आता प्रशासन या मागण्यांवर कितपत गांभीर्याने कार्यवाही करते, याकडे जालनाकरांचे लक्ष लागले आहे.

## नव्या आयुक्त अंजली शर्मा अर्ध्या सभेतून बाहेर

### नगरसेवक वीरेंद्र धोका आक्रमक

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मोठा राजकीय गोंधळ पाहायला मिळाला. महानगरपालिकेच्या नव्याने रुजू झालेल्या आयुक्त अंजली शर्मा या पहिल्यांदाच सर्वसाधारण सभेला उपस्थित राहिल्या होत्या. मात्र सभेदरम्यान शिवसेना आणि भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक रंगली आणि त्यानंतर वातावरण अधिकच तापले.

नंदुरबार येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून कर्यिरत असलेल्या अंजली शर्मा यांनी आज जालना महानगरपालिकेच्या आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर त्या पहिल्यांदाच सर्वसाधारण सभेत सहभागी झाल्या होत्या. नव्या आयुक्तांकडून शहरातील प्रलंबित प्रश्न, विकासकामे आणि प्रशासनातील समन्वय याबाबत ठोस भूमिका अपेक्षित असताना सभेत राजकीय आरोप-प्रत्यारोपांनी वातावरण ढवळून निघाले.

सभेच्या सुरुवातीला काही विषयांवर चर्चा सुरू असताना शिवसेना आणि भाजपच्या सदस्यांमध्ये शाब्दिक वाद निर्माण झाला. हा वाद काही वेळातच तीव्र झाला. दोन्ही बाजूंकडून जोरदार घोषणाबाजी आणि आरोप-प्रत्यारोप सुरू झाल्याने सभागृहातील वातावरण तणावपूर्ण बनले. या गोंधळाच्या




पार्श्वभूमीवर आयुक्त अंजली शर्मा या अर्धवट सभेतून बाहेर गेल्याचे दिसून आले. यामुळे अनेक नगरसेवकांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली.

याच मुद्द्यावरून नगरसेवक वीरेंद्र धोका यांनी आक्रमक भूमिका घेतली. ''नव्या आयुक्तांनी शहराच्या प्रश्नांवर चर्चा ऐकून घेतली पाहिजे होती. सभागृहात गोंधळ झाला म्हणून सभेतून बाहेर जाणे योग्य नाही,'' असा सूर त्यांनी लावत प्रशासनावर अप्रत्यक्ष टीका केली. त्यांनी या प्रकाराबाबत थेट महापौर वंदना मगरे यांच्याकडे विचारणा करत नाराजी व्यक्त केली.

सभागृहातील वातावरण आणखी चिघळू नये म्हणून काही सदस्यांनी हस्तक्षेप केला. त्यावेळी महेश निकम यांनी पुढे येत वीरेंद्र धोका यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्यांना समजावत पुन्हा खुर्चीवर बसवले. काही वेळ वातावरण तापलेले असले तरी नंतर सभा सुरळीत सुरू ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

देशभक्त शहीद शामाप्रसाद मुखर्जी उद्यानाचे रक्षण करा याची मागणी करणारे बॅनर यावेळी श्री धोका यांनी सभागृहात झळकावले.

दरम्यान, नव्या आयुक्तांच्या पहिल्याच सभेत अशा प्रकारे गोंधळ होणे हे प्रशासन आणि सत्ताधारी-विरोधकांसाठी चिंतेचे कारण मानले जात आहे. शहरातील नागरिकांना पाणी, रस्ते, स्वच्छता, मालमत्ता कर, अतिक्रमण, बाजारपेठेतील प्रश्न आणि प्रलंबित विकासकामे यांसारख्या मुद्द्यांवर ठोस निर्णय अपेक्षित असताना सभेत पुन्हा एकदा राजकीय संघर्षच पुढे आल्याचे चित्र दिसले.

# संपादकीय पान

## भारताचे एडिसन

स्वातंत्र्यपूर्व काळातील थोर भारतीय संशोधक डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म २९ एप्रिल १८६७ रोजी मुंबईत झाला. भारताचे एडिसन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे या महान शास्त्रज्ञाचा जन्म मुंबईमध्ये एका मॅजिस्ट्रेटच्या घरी झाला. दोनशेच्यावर निरनिराळे शोध लावणारे आणि चाळीसहून अधिक शोधांचे एकस्व संपादन करणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी असल्याने त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे तरीही त्यांचा विसर पडणाऱ्यांचीच संख्या यंदाही अधिक असेल. ज्या काळात भारतीय नागरिकांना कमी लेखले जात होते त्याकाळात डॉ भिसे यांनी संशोधनक्षेत्रात अजोड कार्य केले. लहानपणी एकदा भिसे साखर आणायला वाण्याकडे गेले. त्यावेळी वाण्यानी लबाडी करून कमी वजनाची साखर दिल्याचं त्यांच्या लक्षात आलं. याबाबत त्यांनी व्यापाऱ्याला विचारलं असता '' माझ्या काट्यावर वश्विास नसेल तर आपोआप वजन करणारं यंत्र शोधून काढ.'' असं वाण्याने त्यांना खोचकपणे म्हटलं. त्यावेळी एक दिवस तुला असे यंत्र देईन अस छोटा शंकर त्यांना आत्मविश्वासाने म्हणाला. लहानपणापासून संशोधनाची आवड असणाऱ्या डॉ भिसे यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी दगडी कोळशापासून गॅस शुद्ध करण्याचे यंत्र बनवले. १८९७ मध्ये इन्व्हेंटर रिव्हीव अँड सायंटिफिक रेकॉर्ड या मासिकाने स्वयंमापन यंत्र करण्याची एक स्पर्धा जाहीर केली. स्वयंमापन यंत्र म्हणजे साखर, पीठ इत्यादी वस्तूंचे गिर्हाईकाला हवं तेवढं वजन करुन देणारं यंत्र. डॉ भिसे यांनी अशा यंत्राचा आराखडा तयार करून पाठवला. त्यांनी तयार केलेल्या वजन मापन यंत्राच्या आराखड्याला इंग्लंडमध्ये पहिले बक्षीस मिळाले. या स्पर्धेत युरोप आणि अमेरिकेतल्या नामांकित यंत्र शास्त्रज्ञांनी भाग घेतला होता हे विशेष. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांनी छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. १९०० साली डॉ भिसे यांचं लक्ष मुद्रण व्यवसायातील यंत्र सामग्रीकडे लागलं. त्या काळी प्रचलित असलेल्या लायनो, मोनो इत्यादी यंत्राची रचना आणि कालमर्यादा यांचा अभ्यास करुन त्यांनी भिसो टाईप या यंत्राचा शोध लावला व त्याचं प्रथम इंग्लंडमध्ये आणि नंतर अमेरिक, जर्मनी, फ्रांस या देशांमध्ये पेटंट घेतले. या यंत्राच्या उत्पादनासाठी सर रतनजी टाटा यांचे सहकार्य मिळवून द टाटा भिसे इन्व्हेशन ही कंपनी १९१० मध्ये लंडन येथे स्थापन केली. पण १९१५ मध्ये ती बंद पडली. त्याच सुमारास दर मिनिटाला साधारण बाराशे अक्षर छापणारं गुणीत मातृका हे यंत्र तयार केलं आणि १९१६ मध्ये विक्रीला आणलं. १९१६ साली भिसे अमेरिकेला गेले तिथे त्यांनी युनिव्हर्सल टाईप क्लस्टर हे यंत्र शोधून काढले आणि अमेरिकेत त्याचं पेटंट घेतले. याशिवाय मुद्रण व्यवसायातली आणखी अनेक यंत्रे त्यांनी तयार केली. १९१० साली साली डॉ भिसे आजारी असताना त्यांच्यावर उपचार करण्यासाठी वापरण्यात आलेलं एक भारतीय औषध फार गुणकारी ठरलं. या औषधाचं रासायनिक पृथःकरण त्यांनी करवून घेतलं आणि त्याच्या गुणकारीपणा आयोडीनामुळे आहे जाणलं. १९१४ साली डॉ शंकर आबाजी भिसे यांनी स्वतःच एक नवीन औषध तयार केले आणि त्या औषधाला बेसलिन हे नाव दिले. हे औषध बाह्योपचारासाठी उपयुक्त ठरले. पहिल्या महायुद्धात या औषधाचा अमेरिकेने मोठ्या प्रमाणात वापर केला. या औषधामुळे पहिल्या महायुद्धात अनेक सैनिकांचे प्राण वाचले. या औषधावर आणखी संशोधन करून आयोडीन घटक असलेलं पण पोटात घेता येईल असं एक औषध नंतर डॉ भिसेंनी तयार केलं या औषधाला ऑटोमेडीयन असं नाव दिलं. हे औषध बऱ्याच रोगांवर उपयुक्त ठरले. पुढे त्यांनी कपडे धुण्यासाठी एक नवे संयुग तयार केले. डॉ भिसे यांनी विद्युत शास्त्रातही अनेक शोध लावले. डॉ भिसे यांच्या साठाव्या वाढदिवशी इंग्लंडमध्ये त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या सुमारास त्यांची महान शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्याशी भेट झाली. एडिसन यांनीही त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला. डॉ भिसे इंग्लंडमध्ये असताना इंग्लंडचे आफ्रिकेशी युद्ध सुरू झाले. स्वयंचलित तोफा काढण्याची विनंती तेथील कारखानदारांनी डॉ भिसे यांना केली. त्यासाठी डॉ भिसे यांना त्यांनी खूप पैसे देऊ केले, पण आपले संशोधन हे विश्वाच्या कल्याणासाठी असून आपल्या संशोधनातून विश्वाचा संहार होऊ नये अशी त्यांची मानवतावादी भूमिका होती. म्हणूनच त्यांनी ही मागणी नम्रतापूर्वक नाकारली. डॉ भिसे यांनी सुमारे २०० शोध लावले. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे ७ एप्रिल १९३५ रोजी या महान शास्त्रज्ञाचे निधन झाले. संशोधन क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. शासनाने त्यांच्या या महान संशोधकाच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन गौरव करावा.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

## डोनाल्ड ट्रम्प; विकृत विचारांचा शिरोमणी

डोनाल्ड ट्रम्प हे मोठे उद्योगपती आहेत त्याचा माज दाखवत सत्तेची सूत्रे हाती आल्याबरोबर स्वर्ग फक्त दोन बोटेच उरतो. जगात सर्वात आपणच सर्व शक्तिमान आहोत ह्या भ्रमात राहून ट्रम्प यांनी युद्धाचा भडका उडवला. इराण इराक इस्रायल अमेरिका ह्यात कोण कोणाबरोबर युद्ध करतो हेच सर्व सामान्य जनतेला कळत नाही. जगजेत्ता होण्याचा कुटील मनसुभा जगाला दोन दशके मागे



नेण्याचा पराक्रम डोनाल्ड ट्रम्प करताहेत. जो बायोडिन व बाराक ओबामा ह्यांच्या कामाचा परामर्श घेताना मी किती उजवा आहे हे जगाला दाखवण्याचा फाजीलपणा करताना जगात आपण चेष्टेचे मानकरी होतोय ह्याचीही तमा बाळगत नाही. मित्र कोण शत्रू कोण ह्याचाही मागमूस त्यांच्या वागण्यात बोलण्यात दिसत नाही. भारत पाकिस्तान युद्ध आपण रोखले ह्याचा गवगवा जगभर केला व आपण मनात आणले तर काहीही करू शकतो हा अहंकार त्यांनी टॅरिफ चा उच्चांक गाठून दाखवला.त्याला भारत सरकारने सडेतोड उत्तर दिले नाही ह्याचा अहंकार शिगेला पोहोचला. खोटे बोल पण रेटून बोल व मी म्हणतो तेचं खरे आणि तसेच घडवणार हा जो अहंकार काठोकाठ भरला आहे. त्यामुळे आज आपण जगात टीकेचे धनी झालो आहोत ह्याचाही त्यांना पश्चाताप होत नाही. चीन रशिया ह्यांना डोनाल्ड ट्रम्प म्हणजे आपले जागतिक भांडवल आहे आणि ते त्याचा पुरेपूर फायदा उचलणार ह्यात शंका नाही. भविष्यात अमेरिकेतच डोनाल्ड ट्रम्प ह्यांना अनेक संकटाना सामोरे जावे लागेल.

**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर (नवी मुंबई) मो.९९२०७७६२७७**

# मैदान गाजवले, मनेही जिंकली

## महसूल क्रीडा स्पर्धेत जालना जिल्ह्याचा डंका; जिल्हाधिकारी यांच्या प्रत्यक्ष सहभागाने उत्साह

**जालना | प्रतिनिधी -** परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या अश्ववेध मैदानावर आयोजित 'छत्रपती संभाजीनगर विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा' जालन्याच्या अष्टपैलू कामगिरीने गाजली. दि.३ ते ५ एप्रिल २०२६ दरम्यान पार पडलेल्या या स्पर्धेत जालना जिल्ह्याने केवळ मैदानी खेळातच नव्हे, तर सांस्कृतिक कार्यक्रमातही बाजी मारत प्रेक्षक आणि परीक्षकांची मने जिंकली. रविवार दि.५ एप्रिल २०२६ रोजी रात्री उशिरापर्यंत चाललेल्या पारितोषिक वितरण समारंभात जालना जिल्ह्याला विभागीय सर्वसाधारण चॅम्पियनशिपमध्ये द्वितीय उपविजेता म्हणून गौरविण्यात आले.

जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी या स्पर्धे दरम्यान वेळोवेळी स्वतः मैदानावर उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढविला. त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळे खेळाडूंमध्ये एक वेगळेच नवचैतन्य संचारले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या या प्रोत्साहनामुळेच खेळाडूंनी आपले सर्वस्व पणाला लावून विविध खेळांमध्ये विजयश्री खेचून आणला.

या स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा खेळातील प्रत्यक्ष सहभाग. केवळ मार्गदर्शक म्हणून न थांबता, जिल्हाधिकारी मित्तल स्वतः टेबल टेनिसच्या मैदानात उतरल्या. त्यांनी हाती बॅट घेत चपळाईने केलेले सर्व्हिस आणि स्मॅश पाहून उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्यांच्या या स्पोर्ट्समन स्पिरीटमुळे जालना संघातील खेळाडूंमध्ये वेगळेच नवचैतन्य निर्माण झाले. केवळ प्रशासकीय कामातच नव्हे, तर खेळाच्या मैदानातही आपण तितकेच तत्पर आहोत, हे त्यांनी टेबल टेनिसच्या स्पर्धेत उतरून दाखवून दिले. प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळतानाच खेळाप्रती असलेली त्यांची ही ओढ खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरली. त्याच बरोबर जालना महसूल विभागातील अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ आणि निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल सांघिक क्रीडा प्रकारात विजयी ठरले असून इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखील क्रीडा स्पर्धेत सहभाग घेत विजयाचा पाया रचला आहे.

**सांस्कृतिक सादरीकरणाने जिंकली मने**

केवळ मैदानी खेळातच नव्हे, तर सांस्कृतिक व्यासपीठावरही जालना जिल्ह्याने आपली छाप पाडली. सांस्कृतिक कार्यक्रमात जालन्याच्या चमूने सादर केलेल्या कलाविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. महसूल विभागातील अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या या कलागुणांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्ह्याचा संघ या विभागीय क्रीडा स्पर्धे त सातत्यपूर्ण कामगिरी करत विविध स्पर्धा प्रकारात जालन्याचे नाव उंचावले आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व कलाकार, खेळाडूंचे कौतुक करत अभिनंदन केले.




वैयक्तिक खेळ प्रकारात बुध्दीबळ प्रथम क्रमांक प्रशांत हरिशचंद्रे, टेबल टेनिस एकेरी प्रथम क्रमांक रवि वैद्य तर दुहेरीत द्वितीय क्रमांक शशिकांत हदगल व रवि वैद्य, बॅडमिंटन दुहेरी द्वितीय क्रमांक कृष्णा मुजमुले व सोमनाथ सर फळे, १०० मिटर धावणे द्वितीय क्रमांक राहुल साळवे, ४०० मिटर धावणे प्रथम क्रमांक योगेश पोटे, उंच उडी प्रथम क्रमांक कृष्णा सोनवणे, गोळा फेक प्रथम क्रमांक राजेश खांडेभराड, थाळी फेक तृतीय क्रमांक प्रकाश जाधव, जलतरण ब्रेस्ट स्ट्रोक प्रथम तर फ्री स्टाईल द्वितीय क्रमांक स्वप्निल चौधरी, जलतरण प्रथम क्रमांक अनिरुध्द झुमडे, ४५ वर्षावरील पुरुष थाळी फेक द्वितीय क्रमांक प्रकाश जाधव, टेबल टेनिस मिश्र प्रथम क्रमांक प्रणाली तायडे व शशिकांत हदगल, ४५ वर्षावरील पुरुष लॉन टेनिस एकेरी सुनिल केंधळे तर दुहेरीत सुनिल केंधळे व रमेश मिसाळ, कॅरम महिला एकेरी द्वितीय क्रमांक सरिता गुंजकर, महिला बॅडमिंटन एकेरी द्वितीय क्रमांक शितल सराटे तर दुहेरी शितल सराटे आणि रश्मी पिलडेकर, १०० मिटर व २०० मिटर धावणे प्रथम क्रमांक मोहिनी कोळसे, ४०० मिटर धावणे प्रथम क्रमांक निता मुळूक, उंच उडी प्रथम क्रमांक तत्पर्ता पाटील, लांब उडी प्रथम क्रमांक मोहिनी कोळसे, गोळा फेक द्वितीय क्रमांक मोहिनी कोळसे, थाळी फेक द्वितीय क्रमांक पुजा चव्हाण, पुरुष सांघिक खेळ प्रकारात ४१०० रिले प्रथम क्रमांक, महिला सांघिक खो खो प्रथम क्रमांक, महिला सांघिक खेळ प्रकारात ४१०० रिले प्रथम क्रमांक तर ४४०० रिले प्रथम क्रमांक पटकाविलेला आहे. याप्रमाणे एकुण २२१ क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा प्रकारात जालना महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळे वाटपाबाबत कडक नियमावली करा

## मराठा महासंघाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**जालना | प्रतिनिधी -** स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांचे वाटप करताना त्यांची गुणवत्ता, देखभाल आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी शासनाने तातडीने कडक नियमावली लागू करावी, अशी मागणी मराठा महासंघाच्यावतीने करण्यात आली आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई-मेल आणि व्यक्ती व्हाट्सअप क्रमांकावर निवेदन पाठवले आहे. या निवेदनात मराठा महासंघाचे राष्ट्रीय विभागीय सचिव अरविंद देशमुख, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक अशोक पडुळ, मराठा सेवक तथा शिवजन्मोत्सव समिती २०२६ चे अध्यक्ष विश्वंभर तिरुखे यांनी म्हटले आहे की, गेल्या काही दिवसांपासून बाळराजे आवरे यांच्याकडून राज्यभरात शिवजयंतीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर शिवरायांच्या पुतळ्यांचे वाटप केले जात आहे. महाराजांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी पुतळे वाटप करणे ही बाब अभिनंदनीय असली, तरी त्यामध्ये काही तांत्रिक आणि सामाजिक धोके आहेत ज्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष करून चालणार नाही. आराध्य दैवताचे पुतळे प्लास्टिक किंवा निकृष्ट फायबरचे नसावेत. ते दर्जेदार धातू किंवा पाषाणाचे असावेत, जेणेकरून भविष्यात त्यांची विटंबना होणार नाही. केवळ प्रसिद्धीसाठी पुतळे न वाटता, जे मंडळ किंवा व्यक्ती पुतळा घेत आहे, ती त्याची सन्मानाने देखभाल करण्यास सक्षम आहे का, याची खातरजमा करावी. सार्वजनिक किंवा वादग्रस्त जागी पुतळ्यांची स्थापना केल्यास त्यातून जातीय तेढ निर्माण होऊ शकते. त्यामुळे खाजगी मालमत्ता किंवा मंदिर परिसरातच पुतळे बसवण्याचे निकष असावेत. महाराजांच्या नावाचा वापर करून स्वतःचे राजकीय हित साध्य करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर प्रशासनाने लक्ष ठेवावे. छत्रपती शिवाजी महाराज ही आपली अस्मिता आहे. त्यांच्या पुतळ्यांची भविष्यात कोणत्याही कारणाने हेळसांड होऊ नये आणि सामाजिक शांतता टिकून राहावी, यासाठी तातडीने हस्तक्षेप करून योग्य नियमावली आखून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# जर खरात नको असेल आपल्या घरात

नाशिकमधील भोंदू बुवा अशोक खरात प्रकरणाने केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय वातावरणालाही धक्का दिला आहे. श्रद्धेच्या नावाखाली होणारी लूट किती भयावह असू शकते, ती किती संघटित असू शकते आणि ती घराघरात किती विद्रूप पद्धतीने शिरू शकते याचे हे सुन्न करणारे उदाहरण आहे.

अशा घटना घडल्या की लोक संताप व्यक्त करतात, निषेध करतात आणि दोषींना शिक्षा व्हावी अशी मागणी करतात. ✻पण या संतापाच्या पलीकडे एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो असा भोंदू आपल्या घरात कधी येऊ नये यासाठी आपण काय करायला हवे?✻

या प्रश्नाचे उत्तर केवळ कायदा किंवा पोलिसांमध्ये नाही. त्याचे उत्तर आपल्या कुटुंबसंस्कृतीत आहे.परंतु या प्रकरणाकडे पाहताना एक मोठी चूक आपण टाळली पाहिजे. ✻अशोक खरात याला केवळ एक व्यक्ती म्हणून पाहणे, गुन्हेगार म्हणून पाहणे धोकादायक आहे. कारण खरात हा अपवाद नाही; तो एका मोठ्या प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करतो.✻ देव आणि धर्माच्या नावाने उभ्या राहिलेल्या अंधश्रद्धेच्या भयंकर बाजाराचा तो प्रतिनिधी आहे.ज्योतिष सांगणारे, मंत्र-तंत्र करणारे, जादूटोणा उतरवणारे, ग्रहशांती करणारे, भविष्य बदलून देण्याचे आश्वासन देणारे असंख्य बुवा-बाबा आपल्या समाजात फिरत आहेत. खरात हा त्या संपूर्ण व्यवस्थेचे उघड झालेले रूप आहे. म्हणूनच केवळ ''खरात वाईट आहे'' असे म्हणणे पुरेसे नाही. खरात नको आपल्या घरात, असे म्हणताना आपण हेही समजून घेतले पाहिजे की ✻ज्योतिष, मंत्र-तंत्र आणि चमत्कारांच्या नावाने चालणाऱ्या संपूर्ण फसवणुकीलाच आपल्या घराचा दरवाजा बंद केला पाहिजे.✻

नाहीतर एक विचित्र मानसिकता तयार होते. आपण म्हणतो ''खरात भोंदू होता, पण आमचे गुरू वेगळे आहेत.'' ''तो फसवा होता, पण आमचे ज्योतिष खरे आहे.'' अशा प्रकारे आपण एका भोंदूला दोष देतो आणि दुसऱ्याला पवित्र मानतो. ही मानसिकता बदलली नाही तर समाजात खरातसारखे भोंदू संपणार नाहीत; फक्त त्यांची नावे बदलत राहतील.

म्हणूनच आपल्या कुटुंबातील सर्वांनी एक मूलभूत गोष्ट स्पष्टपणे समजून घेतली पाहिजे की ✻कोणत्याही ज्योतिषाला माणसाचे भविष्य सांगता येत नाही. आणि भविष्य सांगता येत नाही म्हणून ते बदलता देखील येत नाही.✻ ग्रह-ताऱ्यांच्या हालचालींशी माणसाच्या आयुष्यातील घटना जोडण्याचा जो दावा केला जातो तो विज्ञानाने कधीच मान्य केलेला नाही. त्यामुळे हात पाहणे, कुंडली जुळवणे, अंकशास्त्र, राशीफल, ग्रहशांती, रत्न-खडे, वास्तुदोष यांसारख्या गोष्टी या प्रत्यक्षात भविष्य सांगण्याच्या नावाखाली चालणाऱ्या फसवणुकीचे प्रकार आहेत.

आज अनेक लोक भोंदू बुवांवर टीका करतात; पण त्यांच्या बोटांत राशीचे खडे चमकत असतात. अशा प्रकारे ते नकळतपणे त्याच अंधविश्वासाला पोसत असतात ज्याविरुद्ध ते बोलत असतात. याउलट अशिक्षित ग्रामीण कवयित्री बहिणाबाईंनी मोठे सत्य सांगितले आहे

✻''अरे ज्योतिषा, माझी दारी नको येऊ;✻

✻माझे दैव मले कळे , माझा हात नको पाहू.''✻

या ओळींमध्ये आत्मविश्वास आणि विवेकाची ताकद दडलेली आहे. आपल्या कुटुंबातील मुलांना आणि तरुणांना हे समजावून सांगणे आवश्यक आहे की माणसाचे भविष्य ग्रहांनी नाही तर त्याच्या विचारांनी, कृतीने आणि प्रयत्नांनी घडते.

समाजात अनेकदा असे म्हटले जाते की, ✻'' स्त्रिया अंधश्रद्धेच्या केवळ बळी नसतात तर त्या तिच्या वाहकही असतात.''✻ परंतु या विधानामागील वास्तव समजून घेतले पाहिजे. स्त्रियांनी हे वाहकपण स्वेच्छेने स्वीकारलेले नसते; ते पुरुषप्रधान धार्मिक व्यवस्थेने त्यांच्या माथी मारलेले असते. जेव्हा एखादी स्त्री बुवाबाजीच्या नादी लागते तेव्हा अनेकदा त्यामागे तिची भावनिक असुरक्षितता, एकाकीपणा किंवा जीवनातील ताणतणाव असतात.

मूलबाळ न होणे किंवा केवळ मुलीच होणे याला आजही स्त्रीला जबाबदार धरले जाते.✻ शिक्षण आणि समान संधी पासून स्वातंत्र्यापासून दूर राहिलेली स्त्री हे कोणत्याही भोंदूबुवासाठी सोपे सावज ठरते. म्हणून ज्या घरात स्त्रीला सन्मान मिळतो, तिच्या भावनांना स्थान मिळते, तिच्या स्वप्नांना पंख दिले जातात आणि तिच्या निर्णयक्षमतेवर वश्विास ठेवला जातो, त्या घरात बुवाबाजीला फारशी जागा राहत नाही.

स्त्रीचा सन्मान ही केवळ सामाजिक मूल्याची बाब नाही; ती अंधश्रद्धेविरुद्धची एक महत्त्वाची ढाल देखील आहे.

यासोबतच धर्माच्या नावावरचे राजकारणही ओळखणे आवश्यक आहे. अनेक राजकीय पक्ष आणि धार्मिक संस्था अशा बुवा-बाबांचे उदात्तीकरण करतात. मोठमोठ्या प्रवचनांचे कार्यक्रम आयोजित केले जातात, लाखो लोकांचा जनसमुदाय गोळा केला जातो आणि या माध्यमातून धार्मिक भावनांना राजकीय रंग दिला जातो. -या सापळ्यात आपले कुटुंब अडकणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. ✻आपली धार्मिक भावना, श्रद्धा ही अशा कोणत्याही प्रकारच्या बुवाबाजीला, धर्माधारित राजकारणाला, सत्ताकारणाला पोषक ठरणार नाही याची आपण प्रत्येकानेच काळजी घ्यायला हवी.✻

खरे तर भोंदू बुवा ओळखणे कठीण नसते. ✻जो माणूस चमत्काराचा दावा करतो, जो कर्मकांडांच्या माध्यमातून तुमचे भविष्य बदलून देण्याचे आश्वासन देतो, जो लोकांकडून मोठ्या प्रमाणात पैसा आणि संपत्ती गोळा करतो, तो आध्यात्मिक गुरू नसून भोंदूच असतो.✻ खरे अध्यात्म भीती निर्माण करत नाही; ते माणसाला आत्मविश्वास देते आणि विवेकाचा मार्ग दाखवते.

महाराष्ट्राच्या संतपरंपरेने याच विवेकाचा संदेश दिला आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव किंवा संत गाडगेबाबा यांनी लोकांना चमत्कारांची स्वप्ने दाखवली नाहीत.

त्यांनी लोकांना स्वतःच्या श्रमावर आणि विवेकावर वश्विास ठेवायला शिकवले. कर्मकांडांवर टीका केली आणि समाजाला जागवण्याचा प्रयत्न केला.

म्हणूनच आज या संतपरंपरेचा खरा अर्थ समजून घेण्याची गरज आहे. कारण संतांचा वारसा जपायचा असेल तर तो केवळ अभंग म्हणण्यात नाही; तो विवेक स्वीकारण्यात आहे.

नाशिकच्या खरात प्रकरणाने आपल्याला एक मोठा धडा दिला आहे. भोंदू बुवांचा प्रश्न केवळ एखाद्या व्यक्तीचा नाही; तो समाजाच्या मानसिकतेचा प्रश्न आहे. ज्या समाजात भीती आणि अज्ञान वाढते त्या समाजात भोंदूंची बाजारपेठही वाढते. आणि ज्या समाजात विवेक, आत्मविश्वास आणि वैज्ञानिक दृष्टिकोन वाढतो त्या समाजात अशा भोंदूंची दुकाने आपोआप बंद होतात.

मुलांची लग्न जुळवताना कुंडली सोबत घेऊन फिरणारे पालक, उठता बसता कर्मकांड दोरा धागा मांत्रिकगिरी करणारे कुटुंबातील सदस्य,'' एक लोटा जल, सब समस्या का हल

''म्हणत पहाटे लोटा घेऊन स्वतःच्या प्रश्नांना दैवी उपाय शोधणारे कुटुंबीय, कालसर्प योगाच्या भीतीने त्याच नाशिकमध्ये जाऊन नारायण नागबळी करणारी परिवार ही सारीच अशोक खरात निपजण्यासाठी समाजाची जमीन भुसभुशीत करणारी मानसिकता आहे.

म्हणूनच प्रत्येक कुटुंबाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे ✻आपण आपल्या घरात मुलांना काय देत आहोत? भीती की विवेक? अंधश्रद्धा की विचारशक्ती?✻

जर आपल्या घरात विचार, समानता, सन्मान आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची संस्कृती निर्माण झाली, तर कोणताही भोंदू कोणताही खरात त्या घरात पाय ठेवू शकणार नाही.

कारण भोंदूंचा दरवाजा बाहेर नसतो; तो घरातूनच उघडतो.

**विनायक सावळे,**
**राज्य प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती.**
**९४०३२५९२२६**

# जालना महापालिकेत भाजपच्या विजयाला काँग्रेसची छुप्या युती कारणीभूत?

## राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) तय्यब देशमुख यांचा गंभीर आरोप

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने मिळवलेले स्पष्ट बहुमत आणि महापौर-उपमहापौर पदावर बसवलेला कब्जा, हा महाविकास आघाडीच्या प्रयोगाला बसलेला मोठा तडा मानला जात आहे. मात्र, या पराभवाचे खापर आता थेट काँग्रेस पक्षावर फोडण्यात आले असून, ''काँग्रेसने राष्ट्रवादीच्या पाठीत खंजीर खुपसून भाजपला मदत केली,'' असा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चे शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी केला आहे.

**युतीचा बनाव आणि काँग्रेसची गद्दारी?**

जालना महानगरपालिकेत सेक्युलर पक्षांची सत्ता यावी यासाठी माजी मंत्री राजेशभैय्या टोपे आणि जिल्हाध्यक्ष डॉ. निसार अहमद देशमुख यांनी शर्थीचे प्रयत्न केले होते. राजेशभैय्या टोपे यांची भूमिका सर्व मित्रपक्षांना सोबत घेऊन शहर महाविकास आघाडी करण्याची होती. मात्र, ऐनवेळी काँग्रेससोबत युती झाली असतानाही, काँग्रेसने राष्ट्रवादीच्या उमेदवारांसमोर आपले उमेदवार उभे करून मित्रधर्माला हरताळ फासला, असा आरोप देशमुख यांनी केला आहे.

''जर काँग्रेसने ही गद्दारी केली नसती, तर आज जालना महापालिकेचे चित्र वेगळे असते. युती करून आपल्याच मित्राच्या विरोधात उमेदवार उभे करणे, ही गद्दारी नाही तर काय?'' - तय्यब बापू देशमुख

**भोकरदन पॅटर्नचा विसर?**

यावेळी बोलताना देशमुख यांनी भोकरदन नगरपालिकेचे उदाहरण दिले. भोकरदनमध्ये आमदार चंद्रकांत दानवे पाटील यांनी एकला चलो रे ची भूमिका घेत सर्वधर्मीय जनतेला सोबत घेतले आणि विजय मिळवला. तिथे एका अल्पसंख्याक समाजाच्या कार्यकर्त्याला नगराध्यक्ष करून न्याय दिला गेला. जालन्यात मात्र काँग्रेसच्या खासदार आणि जिल्हाध्यक्षांच्या चुकीच्या धोरणामुळे भाजपचा मार्ग मोकळा झाला, अशी टीका त्यांनी केली.

**स्वीकृत नगरसेवक पदावरून संताप: भाजप पदाधिकाऱ्याला संधी?**

बातमीतील सर्वात धक्कादायक दावा स्वीकृत नगरसेवक पदाबाबत आहे. काँग्रेसने आपल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्याला स्वीकृत नगरसेवक पदासाठी संधी दिल्याचा आरोप तय्यब बापू देशमुख यांनी केला आहे.

**जनतेत चर्चा: काँग्रेसचे दोन गट पडले आहेत का?**

आरोप: ''तुला जास्त, मला कमी'' अशा अंतर्गत साठमारीत काँग्रेसने भाजपला पूरक भूमिका घेतली.

सवाल: काँग्रेसकडे स्वतः चा एकही सक्षम कार्यकर्ता नव्हता का, जो भाजपच्या नेत्याला संधी द्यावी लागली?



**हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे कारवाईची मागणी**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अलीकडेच काही फुटीर नगरसेवकांवर निलंबनाची कारवाई केली. यावर भाष्य करताना देशमुख म्हणाले की, ''जर सामान्य कार्यकर्त्यांवर कारवाई होत असेल, तर युती फिसकटवणाऱ्या आणि भाजपला मदत करणाऱ्या मोठ्या नेत्यांवर (खासदार व जिल्हाध्यक्ष) कारवाई का होत नाही? काँग्रेस पक्ष जाणीवपूर्वक भाजपला मदत करून जनतेच्या डोळ्यात धूळफेक करत आहे.''

जालना जिल्ह्यातील काँग्रेस हळूहळू भारतीय जनता पार्टीच्या मार्गावर जात असल्याची चर्चा आता सर्वसामान्यांमध्ये रंगली आहे. आगामी निवडणुकांमध्ये या अंतर्गत युतीचा फटका कोणाला बसणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. राष्ट्रवादी काँग्रेसच्या या आक्रमक पवित्र्यामुळे जालन्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

# जनगणना फिल्ड ट्रेनर्सच्या तीन दिवसीय प्रशिक्षणास सुरुवात

**जालना । प्रतिनिधी -** भारताची आगामी जनगणना २०२७ ही पूर्णपणे हायटेक होणार असून, पारंपारिक कागद-पेन ऐवजी ही प्रक्रिया डिजिटल स्वरूपात पार पडणार आहे. या महाकाय मोहिमेच्या पूर्वतयारी प्रशिक्षणाला जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि.६ एप्रिल पासून क्षेत्रीय प्रशिक्षकांच्या तीन दिवसीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली.

या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी शशिकांत हदगल, मुंबई येथील जनगणना कार्यालयाचे एस.आय. सत्यांशू सिंग, नायब तहसीलदार सतिश तायडे, मास्टर ट्रेनर प्रमोद कुमावत यांच्यासह जनगणना कक्षाचे कर्मचारी आणि जिल्ह्यातील नियुक्त फिल्ड ट्रेनर्स उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालय आणि जनगणना संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळेस होणारी जनगणना मोबाईल अॅप आणि वेब पोर्टलच्या माध्यमातून केली जाणार असल्याने माहिती संकलन अधिक जलद आणि अचूक होईल, असा वश्विास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

प्रशिक्षणादरम्यान फिल्ड ट्रेनर्सना प्रामुख्याने अॅप (हाऊस लिस्टींग ऑपरेशन अॅप) आणि स्वयंगणना पोर्टलचा वापर कसा करावा, याचे तांत्रिक धडे दिले जात आहेत. पहिल्या टप्प्यात घरांची यादी करणे आणि उपलब्ध सुविधांची माहिती गोळा करण्यावर भर दिला जाणार आहे. जनगणनेतील ३३ विविध प्रश्नांचे स्वरूप आणि त्यांची अचूक उत्तरे डिजिटल पद्धतीने कशी नोंदवायची, याचे कौशल्य या प्रशिक्षणातून विकसित केले जात आहे. डिजिटल

प्रक्रियेत नागरिकांच्या माहितीची गोपनीयता राखणे सर्वात महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने डेटा सुरक्षितता आणि गोपनीयतेबाबत ट्रेनर्सना विशेष मार्गदर्शन करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, यंदा नागरिकांना स्वतःची माहिती स्वतः भरण्यासाठी स्वयंगणना ही विशेष सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# हॅप्पी टू हेल्प फॉउंडेशन तर्फे भव्य दिव्य बक्षीस वितरण व आदर्श शिक्षक पुरस्कार सन्मान सोहळा थाटात संपन्न!



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** सालाबादप्रमाणे या १२व्या वर्षी ही हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन तर्फे शिक्षकांसाठी ईद ए मिलादुन्नबी निमित्त राज्यस्तरीय निंबध स्पर्धा ठेवण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये विजेत्यानां पारितोषिक व ट्रॉफीचे वितरण करण्यात आले तसेच शिक्षक-शिक्षिका मध्ये उत्कृष्ठ शिक्षण देणाऱ्यां शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीचे चेअरमन (राज्यमंत्री दर्जा) ना.हसीन अख्तर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हुणून शिक्षक आमदार विक्रम काळे तसेच सत्कारमूर्ती तसेच प्रमुख पाहुणे जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे हे उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास कल्याण जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगल पांचाळ हे उपस्थिती होत्या. माजी नगरसेवक कॉ. शेख बाबू, राष्ट्रवादी शिक्षक संघाचे प्रदीप विखे, एम एम खुटे, रमाकांत, शिक्षक नेते दिलीप ढाकणे, राजेश हिवाळे, विजय साळकर, शिक्षण मंडळाचे कार्यवाह नवाब नकाशब्दी, डॉ. प्रा. शाहेद आदींची उपस्थिति होती. कार्यक्रमाची सुरुवात कुराण पठणाने तर कार्यक्रमाची सांगता(शेवट) राष्ट्रगीत गायन करून झाली. सर्व प्रथम सर्व प्रमुख पाहुण्यांचे हॅप्पी टू हेल्प फॉउंडेशनच्या परंपरेनुसार सर्वाना पुस्तक व शाल आणि मोमेंटो देऊन सत्कार करण्यात आले. प्रथम ईद मिलाद नबी निमीत्त घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतील अनुक्रमाने प्रथम, द्वितीय अणि तृतीय विजेत्यांना एक पुस्तक, शानदार ट्राफी, सन्मान पत्र व रोख रक्कम बक्षिसे देण्यात आली. तसेच या वर्षी दोन प्रोत्साहनपर बक्षिसे अनुक्रमे देण्यात आले. तसेच राज्यस्तरीय आदर्श शिक्षक-शिक्षिका पुरस्कार २०२५ राज्यातून ६ शिक्षकांना देण्यात आले. तसेच ९ शिक्षकांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वाटप करण्यात आले. सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षक-शिक्षिकांना मान्यवराच्या हस्ते शानदार ट्राफी, सन्मान पत्र एक पुस्तक आणि शाल देऊन सन्मान करण्यात आले. कार्यक्रम मौलाना आझाद संशोधन केंद्र, टीव्ही सेंटर औरंगाबाद येथे हा सोहळा थाटात उत्साहात पार पडला,कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन मुजीब आलम खान यांनी केले तर प्रास्ताविक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम तर शिक्षक आमदार श्री.विक्रमजी काळे, ना. हसीन अख्तर, डॉ. पांचाळ मॅम मॅडम यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले. अध्यक्षणीय भाषणात राज्यमंत्री दर्जा प्राप्त उर्दू साहित्य अकादमीचे चेअरमन हसीन अख्तर म्हणाले की हॅप्पी टू हेल्प फॉउंडेशनचे प्रत्येक कार्य सर्वांना प्रेरणादायी आहे तसेच शिक्षकांनीं आपली जबाबदारी खंबीरपणे पाळावी. तसेच हॅप्पी टू हेल्प फॉउंडेशनच्या सर्व टीम व विशेषकरून रहीम सरांना बधाई देतो की त्यांनी इतके चांगले उपक्रम यशस्वीपणे राबविले आहे हा शिक्षकांना प्रेरणा देण्याचे कार्य १२ वर्षापासून करीत आहे. शिक्षक आमदार विक्रम काळे म्हणाले की हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन सदैव विद्यार्थी आणि शिक्षकांचे समस्या शासन दरबारी मांडत आहे आणि त्यानं यश ही प्राप्त होत आहे. पुरस्कार प्राप्त शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे कारण आता पुरस्कार मिळाले आहे. आभार प्रदर्शन शफिक पठाण सर यांनी केले. या कार्यक्रमामध्ये शिक्षक बंधू-भगिनीं, मित्र परिवार तसेच शैक्षणिक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या नंतर सर्वांनी जेवणाचा आस्वाद घेतला.या भव्य दिव्य कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम, शेख शब्बीर ,शफीक पठाण, शाहरुख पठाण, सय्यद ताजीम, अमोल कुळकर्णी, शाहरुख पठाण, अॅड. इरफान खान, शेख जफर, शेख साबीर, शेख यासेर, फरमान खान, इलियास सिद्दीकी, शेख अलीम,शाहीन नाज, इम्रान खान, अरमान शेख आदींनी प्रयत्न केले.



# पराभवाच्या जखमेपेक्षा जनसेवेचे व्रत मोठे; वाढदिवसानिमित्त उसळला प्रेमाचा महापूर

## पराभव पचवून सेवेसाठी पाय रोवून उभा असलेला छावा विष्णूभाऊ पाचफुले यांचा वाढदिवस जल्लोषात

**जालना । प्रतिनिधी -** राजकारणाच्या पटलावर काही माणसं पद मिळवण्यासाठी येतात, तर काही माणसं लोकांसाठी आपलं आयुष्य पणाला लावतात. शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णूभाऊ पाचफुले हे दुसऱ्या गटातले नेतृत्व. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीच्या निकालाने आकड्यांचे गणित जरी बदलले असले, तरी जालन्यातील सामान्य माणसाच्या मनातील विष्णूभाऊंचे स्थान तिळमात्रही हललेले नाही. उलट, ‘‘आमचा महापौर विष्णूभाऊच‘‘ ही भावना आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त अधिक तीव्रतेने उमटून आली.

*तो गेम झाला, पण माणूस हरला नाही!* : निवडणुकीच्या रणधुमाळीत संपूर्ण शहराच्या ओठावर एकच नाव होते, ते म्हणजे विष्णूभाऊ. पण राजकारणात कधी कधी प्रामाणिकपणालाही धूर्त रणनीतीचा सामना करावा लागतो. वरिष्ठ पातळीवरील काही धक्कादायक डावपेच आणि राजकीय चक्रव्यूहामुळे विष्णूभाऊंना यशाने हुलकावणी दिली. आज जालन्यातील प्रत्येक गल्लीत एकच चर्चा आहे ‘‘विष्णूभाऊंच्या लोकप्रियतेची धास्ती वाटल्यानेच त्यांचा राजकीय गेम झाला का?‘‘ पण म्हणतात ना, ‘‘सोनं जेवढं आगीत तापतं, तेवढं अधिक झळाळतं.‘‘ विष्णूभाऊंच्या बाबतीत तेच घडतंय.


*पराभव पचवून सेवेसाठी पाय रोवून उभा असलेला छावा* :

विष्णूभाऊंचा स्वभाव हा रडणाऱ्यातला नसून लढणाऱ्यातला आहे. निवडणूक निकालाच्या दुसऱ्याच दिवसापासून ते पुन्हा एकदा जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी मैदानात उतरले. पद नसतानाही तेवढ्याच तत्परतेने काम करणे, ही जिद्द केवळ एका सच्च्या शिवसैनिकातच असू शकते. त्यांच्या याच झुंजार वृत्तीचे कौतुक करण्यासाठी आज त्यांच्या वाढदिवशी कार्यकर्त्यांची अलोट गर्दी झाली.

*वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव*

वाढदिवसाचे औचित्य साधून मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव देशमुख, कोषाध्यक्ष अशोक पडूळ, कामगार आघाडीचे मंगेश मोरे, अंकुश पाचफुले, शक्ती राजपूत, दिव्यांग संघटनेचे राहुल मुळे यांसह अनेक सामाजिक व राजकीय क्षेत्रातील दिग्गजांनी त्यांची भेट घेतली. ही केवळ शुभेच्छांची भेट नव्हती, तर विष्णूभाऊंच्या पाठीशी उभ्या असलेल्या वज्रमूठ संघर्षाची साक्ष होती.

*आई तुळजाभवानीचा आशीर्वाद आणि ती सिंहगर्जना* : विष्णूभाऊंनी कधीही सत्तेसाठी तडजोड केली नाही. त्यांची पक्षनिष्ठा हीच त्यांची ताकद आहे. ‘‘इतिहास साक्ष आहे, विजयाचा मार्ग हा संघर्षातूनच जातो,‘‘ असे म्हणत त्यांच्या समर्थकांनी आज निर्धार व्यक्त केला. आज जरी ते महापालिकेत नसले, तरी लोकांच्या सुख-दुःखात ते सर्वात आधी हजर असतात. आई तुळजाभवानीच्या आशीर्वादाने हा सह्याद्रीचा छावा पुन्हा एकदा अशी डरकाळी फोडणार की, ज्याचा आवाज संपूर्ण जिल्ह्याला ऐकू जाईल. ‘विष्णूभाऊ म्हणजे केवळ नाव नाही, तर जालन्यातील सामान्य कष्टकऱ्याचा आवाज* : अपयश ही यशाची पहिली पायरी आहे, आणि विष्णूभाऊ आता त्या पायरीवर खंबीरपणे पाय ठेवून यशाच्या शिखराकडे कूच करत आहेत.‘‘ या भावनांसह विष्णूभाऊ पाचफुले यांना वाढदिवसाच्या आणि त्यांच्या उज्वल राजकीय भविष्याच्या लाख लाख शुभेच्छा!



# धक्कादायक: सदस्यत्व नसतानाही दोन वर्षे अध्यक्षपदावर; साईनाथ पवारांचे दुकान बंद, परवाने केले सरेंडर

## संस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच असा भोंदूपणा - प्रमोद तोतला यांचा घणाघाती आरोप

**जालना । प्रतिनिधी -** एखाद्या संघटनेचा सदस्य नसतानाही चक्क दोन वर्षे अध्यक्ष म्हणून मिरवण्याचा प्रताप साईनाथ पवार यांनी केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. सुशिक्षित सभासदांच्या संघटनेत घडलेली ही जगातील कदाचित पहिलीच दुर्मिळ घटना असावी, अशा शब्दांत संस्थापक अध्यक्ष प्रमोद तोतला यांनी या प्रकरणाचा जाहीर पंचनामा केला आहे. अखेर कायदेशीर कचाट्यात अडकणार हे लक्षात येताच पवार यांनी आपल्या बंद दुकानाचे परवाने सरेंडर केले आहेत.

साईनाथ पवार हे ज्या आदेश मेडिकलच्या नावावर संघटनेचे सभासद झाले होते, त्या दुकाची जागा मूळ मालकाने दोन वर्षांपूर्वीच ताब्यात घेतली होती. नियमानुसार, दुकान अस्तित्वात नसल्याने त्यांचे सभासदत्व तांत्रिकदृष्ट्या संपुष्टात आले होते. मात्र, ही बाब लपवून ठेवत पवार यांनी गेल्या दोन वर्षांपासून अध्यक्षपदाची धुरा बेकायदेशीरपणे सांभाळली.

**तक्रारीनंतर धाबे दणाणले**

या गंभीर फसवणुकीबाबत प्रमोद तोतला यांनी अन्न व औषध प्रशासन () आणि राज्य संघटनेच्या घटना समितीकडे लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेतली जाणार आणि कायदेशीर कारवाई होणार हे स्पष्ट होताच, साईनाथ पवार यांनी घाईघाईने त्या बंद दुकानाचे परवाने प्रशासनाकडे सरेंडर केले आहेत. पवारांच्या या कृतीमुळे त्यांनी सदस्य नसताना पद भूषवले या आरोपावर शिक्कामोर्तब झाले आहे.

संस्थापक अध्यक्ष प्रमोद तोतला यांनी या प्रकरणावर तीव्र संताप व्यक्त करत खालील मागण्या केल्या आहेत.

**खर्च वसुली:** सदस्य नसताना पवार यांनी अध्यक्ष म्हणून घेतलेले सर्व निर्णय रद्दबातल ठरवावेत आणि या काळात संघटनेचा जो काही पैसा खर्च झाला, तो त्यांच्याकडून वसूल करावा.



सभासदांची दिशाभूल करून त्यांचा विश्वासघात केल्याबद्दल त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी.

**अधिकार संपुष्टात:** परवाने सरेंडर केल्यामुळे आता त्यांना अध्यक्ष म्हणून मिरवण्याचा कोणताही नैतिक किंवा कायदेशीर अधिकार उरलेला नाही.

नवे सभासदत्व अनिवार्य: जर त्यांना पुन्हा संघटनेत यायचे असेल, तर नवीन सभासद म्हणून नोंदणी करून पुन्हा रीतसर निवडून यावे लागेल.

‘‘आम्ही योग्य वेळी ही बाब समोर आणली नसती, तर सदस्य नसलेली व्यक्ती कितीतरी दिवस संघटनेच्या सर्वोच्च पदावर बसून सभासदांची फसवणूक करत राहिली असती. हा सुशिक्षित वर्गाचा अपमान आहे.‘‘ असे प्रमोद तोतला यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले आहे.

या प्रकारामुळे संपूर्ण संघटनेत मोठी खळबळ उडाली आहे. एका बाजूला सुशिक्षित व्यावसायिकांची संघटना असताना, दुसरीकडे असा भोंदूपणा इतके दिवस चाललाच कसा, असा प्रश्न आता सामान्य सभासद विचारत आहेत. आता राज्य संघटना यावर काय ठोस भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गजानन राठोड यांच्यावर कारवाईची मागणी

## मातंग मुक्ती सेनेचा एल्गार; अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण!



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात नेमकं चाललंय काय? रक्षकच जर भक्षकांचे मित्र बनले, तर जनतेने जायचं कुणाकडे? जालन्यातील परतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सध्या कायद्याचा नाही, तर अवैध धंद्यावाल्यांचा धिंगाणा सुरू आहे! आणि धक्कादायक बाब म्हणजे, या धंद्यांना खतपाणी घालणारा एक वर्दीतला चेहरा आता समोर आला आहे!

मातंग मुक्ती सेनेने पोलीस प्रशासनाला थेट इशारा दिलाय. परतूरमध्ये वाळू उपसा, मटका, दारू विक्री आणि ऑनलाईन जुगाराचा बाजार भरलाय. पण पोलीस काय करतायत? असा आरोप होतोय की, पोलीस कॉन्स्टेबल गजानन राठोड हे या अवैध धंद्यावाल्यांचे किंगपिन बनले आहेत! बदली झाली तरी खुर्ची सोडली नाही? गजानन राठोड यांची २०२३ मध्येच बदली झाली आहे, असं असतानाही ते अजूनही परतूर पोलीस स्टेशन का सोडत नाहीत? त्यांना तिथे नक्की कशाचा मोह आहे?

गुन्हेगारांशी हातमिळवणी? अवैध धंदेवाल्यांशी त्यांचे घनिष्ठ संबंध असल्याचा खळबळजनक आरोप पत्रात करण्यात आला आहे.

जर गजानन राठोड यांचा कॉल डिटेल्स रेकॉर्ड तपासला, तर मोठे मासे गळाला लागतील आणि अनेक गुपिते उघड होतील, असा दावा संघटनेने केला आहे. तुमच्याच खात्यातील एक कर्मचारी उघडपणे कायद्याची पायमल्ली करत असेल, तर कारवाई कधी होणार? गजानन राठोड यांना पाठीशी घालणारे वरचे हात कुणाचे आहेत? परतूरची जनता आज दहशतीच्या छायेत आहे. तरुण पिढी या जुगार आणि नशेत उद्ध्वस्त होतेय. जर १५ एप्रिल २०२६ पर्यंत या खाकीतल्या काळ्या मेंढ्यावर आणि अवैध धंद्यांवर कारवाई झाली नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

आता बघायचं हेच आहे की, प्रशासन या गजानन राठोड यांची चौकशी करून त्यांना घरी धाडतं की पुन्हा एकदा तारीख पे तारीख देऊन विषय दाबला जातो?

# जालना शहरातील राजपूतवाडी येथील जमिनीतून ज्वलनशील पदार्थ तांत्रिक बिघाडामुळे

## नागरीकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील सामानगाव रोड परिसरात जमिनीतून ज्वलनशील पदार्थ बाहेर पडत असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने नागरकिंमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, या घटनेमागील नेमके कारण आता स्पष्ट झाले असून, हा प्रकार कोणताही नैसर्गिक आपत्ती नसून विद्युत तांत्रिक बिघाडामुळे घडल्याचे समोर आले आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागाने तातडीने महावितरण () अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. महावितरणच्या अधिक्षक अभियंत्यांनी दिलेल्या माहितीनुसार बिघाड दुपारी सुमारे ४:४५ वाजता दुरुस्त करण्यात आला. तसेच वीज पुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला असुन, सध्या परिसरात स्थिती पूर्णपणे सामान्य आहे.

प्राप्त माहितीनुसार, संबंधित ठिकाणी असलेल्या ११ KV सॅटेलाइट फीडरच्या कंडक्टरचा संपर्क V-cross arm आणि RSJ पोलशी आला. हा संपर्क faulty pin insulato मुळे झाला आणि त्यामुळे विद्युत प्रवाह थेट पोलमार्फत जमिनीत उतरला . परिसरात खडकाळ जमीन असल्यामुळे, या तीव्र विद्युत प्रवाहामुळे खडक वितळून लाव्ह्यासारखा दिसणारा पदार्थ बाहेर येताना दिसला, ज्यामुळे नागरकिंमध्ये भीती पसरली होती. तरी नागरीकांना आवाहन करण्यात येते की, हा प्रकार ज्वालामुखी किंवा नैसर्गिक आपत्ती नसून तांत्रिक बिघाडामुळे झाला आहे. नागरिकांनी अफवांवर वश्विास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# वंचितचे गॅस टंचाईबाबत कलेक्टर कचेरीसमोर अनोखे आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** गॅस टंचाईबाबत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नरेंदर कब मिलेंगा गॅस सिलेंडर आंदोलन करण्यात आले. यावेळी चुलीवर भाजलेली भाकर आणि कांदा जिल्हा प्रशासनास देण्यात आला.

या आंदोलनाचे नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे, रामप्रसाद थोरात, मराठवाडा उपाध्यक्ष दीपक डोके ,महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष रमाबाई होर्शिल आदींनी केले. यावेळी चुलीवर भाकरी भाजण्यात आली. गॅस टंचाईवरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारविरुद्ध घोषणाबाजी करण्यात आली. यानंतर वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांची भेट घेऊन त्यांना कांदा- भाकरीसोबत आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. सर्व सामान्य माणसाला तात्काळ गॅस सिलेंडर उपलब्ध करून द्यावे, गॅस सिलेंडरचा काळा बाजार रोखावा, २५ दिवसानंतर गॅस मिळेल ही अट शिथील करण्यात यावा,काळा बाजार करणाऱ्या लोकांवर सक्त कायदेशीर कारवाई करण्यात यावी, वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सरकारकडून कम्युनिटी किचनसुरू करावे, सरकारकडून प्रत्येक २ किलोमिटरवर जेवणाची व्यवस्था करून गरजू लोकांना अन्न देण्यात यावे, जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यामध्ये उज्ज्वला गॅस योजनेअंतर्गत किती लोकांना गॅस सिलेंडर दिले आहे? याचे ऑडीट करावे आदी मागण्याचा निवेदनात समावेश आहे.

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव प्रशांत कसबे, किशोर त्रिभुवन, जिल्हा उपाध्यक्ष अकबर इनामदार ,परमेश्वर खरात, राजेंद्र खरात, भानुदास साळवे,हरेश रत्नपारखे, गौतम वाघमारे, दीपक खाजेकर ,विजय लहाने,सुशिलाबाई गायकवाड, मायाबाई वानखेडे, परमेश्वर ढवळे, शेख जमीर, हनुमंत मोरे, संदीप रत्नपारखे, रोहन वाघमारे, रविंद्र भदर्गे, राहुल नाटकर,सुभाष जाधव, विलास भिंगारे,गोपाल गावडे, गौतम पटेकर,रवींद्र सुतार, उत्तम खरात, नितेश सोनवणे, शत्रुघ्न कोळी, मनोहर म्हसके यांच्यासह वंचित बहुजन आघाडी, महिला आघाडी, युवक आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, गॅस टंचाईबाबत आंदोलन करून वंचित बहुजन आघाडीने जनतेच्या भावना सरकारपर्यंत पोहचविल्या असल्याचे जिल्हाध्यक्ष ( पूर्व) रामप्रसाद थोरात यांनी यावेळी सांगितले.

### सरकार निवडणुकीत तल्लीन

यावेळी बोलतांना वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अमेरिकेपुढे मुजरा घालत आहेत, आखाती युद्धाचे निमित्त पुढे करून केंद्र सरकारने जाणीवपूर्वक गॅस टंचाई निर्माण केली आहे, गॅस सिलेंडरसाठी मोठ्या प्रमाणात रांगा लागत असतांना शिवाय नागरिकांचे बळी जात असताना सरकारने गॅस सिलेंडरच्या टंचाईवर उपाय योजना केलेली नाही, भाजप पार्टी ही जनतेच्या ज्वलंत प्रश्नांना बगल देत निवडणुकीत तल्लीन झाली आहे, गॅस टंचाईबाबत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशानुसार आज महाराष्ट्रभर गॅस टंचाईबाबत आंदोलन करण्यात आले आहे, गॅस टंचाई दूर झाली नाही तर जालना जिल्ह्यात तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही घुमारे यांनी यावेळी दिला.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.